विविध विभागांतर्गत राबविण्यात येणा-या चालू योजनांचे मुल्यमापन करुन त्यांचे सुसूत्रीकरण करणे तसेच साधनसंपत्तीच्या स्त्रोतांचा अभ्यास करुन त्यामध्ये वाढ करण्याकरीता उपाययोजना सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२२/अर्थसंकल्प-१,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक - १६ जानेवारी, २०२५.

**प्रस्तावना :-**

मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांनी दिनांक २८ जून, २०२४ रोजी सन २०२४-२५ या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणाच्या परिच्छेद क्र. १०१ मध्ये खर्चाचे नियोजन करण्याच्या अनुषंगाने योजनांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचे घोषित केले आहे. तसेच, मुख्य सचिव यांच्या तिस-या राष्ट्रीय परिषदेमध्ये मर्यादीत निधीचा चांगल्या प्रकारे वापर आणि जलद आर्थिक वाढ साध्य करण्यासाठी योजनांचे एकत्रिकरण करणे, संस्थांचे एकत्रिकरण करणे, अनुत्पादक अनुदान योजना कमी करणे तसेच उत्पादक भांडवली खर्च वाढविणे यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना मा. प्रधानमंत्री महोदयांनी सर्व राज्यांना दिल्या आहेत.

उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने राज्यातील चालू असलेल्या योजनांचे मुल्यमापन करुन सुसूत्रीकरण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

विविध विभागांतर्गत राबविण्यात येणा-या चालू योजनांचे मुल्यमापन करुन त्यांचे सुसूत्रीकरण करणे तसेच **साधनसंपत्तीच्या स्त्रोतांचा अभ्यास करुन त्यामध्ये वाढ करण्याकरीता उपाययोजना सुचविण्यासाठी** खालीलप्रमाणे उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १) | मा. राज्यमंत्री (वित्त) | अध्यक्ष |
| २) | मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र<br>(महाराष्ट्र इन्स्टीट्यूटशन फॉर ट्रान्स्फॉरमेशन) | सदस्य |
| ३) | अपर मुख्य सचिव (वित्त) | सदस्य |
| ४) | अपर मुख्य सचिव (नियोजन) | सदस्य |
| ५) | प्रधान सचिव (व्यय) | निमंत्रक |
| ६) | सचिव (वित्तीय सुधारणा) | सदस्य |
| ७) | संबंधित विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव | सदस्य |

२. या समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे राहील :-

i) विविध प्रशासकीय विभागांतर्गत चालू असलेल्या राज्य योजनांचे /जिल्हा योजनांचे लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत थेट पोहचावेत यासाठी अशा सर्व योजनांचे मुल्यमापन करुन त्याचे सुसूत्रीकरण करण्यासाठी संबंधित विभागासमवेत अशा योजनांचा आढावा घेवून योजनांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी शासनास शिफारस करणे.

ii) विविध योजनांच्या सुसूत्रीकरणासंदर्भात मित्र संस्थेने तयार केलेले प्रस्ताव देखील या समितीस सादर करण्यात यावेत. समितीने संबंधित विभागासमवेत अशा प्रस्तावांबाबत आढावा घेवून योजनांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी शासनास शिफारस करणे.

iii) कालबाह्य झालेल्या योजनांच्या बाबतीत तसेच, ज्या ठिकाणी योजनांच्या लाभाची द्विरुक्ती होत असेल, योजनांच्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने द्विरुक्ती होत असेल, अशा योजनांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी शासनास शिफारस करणे.

iv) मर्यादीत निधीचा चांगल्या प्रकारे वापर आणि जलद आर्थिक वाढ साध्य करण्यासाठी योजनांचे एकत्रिकरण करणे, संस्थांचे एकत्रिकरण करण्यासाठी शासनास शिफारस करणे.

v) महाराष्ट्र शासनाच्या साधनसंपत्तीच्या (कर उत्पन्न व करेतर उत्पन्न यांचा) स्त्रोतांचा अभ्यास करुन त्यामध्ये वाढ करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

३. सदर समितीसमोर संबंधित विभागनिहाय बैठकीचे आयोजन करणे, बैठकीस संबंधितांना निमंत्रित करणे तसेच बैठकीचे इतिवृत्त तयार करुन अंतिम करणे, इत्यादी अनुषंगिक कार्यवाही करण्याची जबाबदारी, ज्या विभागाची बैठक आयोजित करावयाची आहे तो संबंधित विभाग वित्त विभागातील ज्या व्यय कार्यासनाकडे आहे त्या व्यय कार्यासनाच्या सह सचिव/ उप सचिव यांनी प्रधान सचिव (व्यय) तथा समितीचे निमंत्रक यांच्या पर्यवेक्षणाखाली पार पाडावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०११६१८०४२२१९०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PANDURANG JOTIBA JADHAV

Digitally signed by PANDURANG JOTIBA JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=476d37b83707d4fa8d081fe85145aa8df78154c98a1889573cd2900918d397e5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A256E2285AACFD4CDF1A5A468970133F213ECC0C01D84AA031BA50479F2EEF89, cn=PANDURANG JOTIBA JADHAV
Date: 2025.01.16 18:05:47 +05'30'

**(पां.जो. जाधव)**

**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,मंत्रालय, मुंबई.

३) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.

५) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.

६) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.

७) मा. राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
८) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
९) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र (महाराष्ट्र इन्स्टिटयूटशन फॉर ट्रान्स्फॉरमेशन)
११) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) प्रधान सचिव (व्यय) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) सचिव (वित्तीय सुधारणा) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) सर्व सह सचिव/उप सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) सर्व सह सचिव / उप सचिव (अर्थसंकल्प शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) निवड नस्ती, अर्थ-१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.